खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२५ – २६

### खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ - वार्षिक सभा

लोकमत

## खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क



**राजगुरुनगर :** खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाची ५१वी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थाध्यक्ष ॲड.देवेंद्र बुट्टे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात (दि. १९ रोजी) उत्साहात संपन्न झाली. संस्थेच्या वार्षिक अहवालाचे वाचन उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी केले. विषयपत्रिकेनुसार सभासदांनी चर्चा केली. नवीन विस्तारित इमारत बांधकाम, प्रवेश घेतलेल्या आणि परीक्षेचा फॉर्म न भरलेल्या विद्यार्थ्यांच्या थकीत शुल्कासंदर्भात सभेत चर्चा करून निर्णय घेण्यात आले.

**नवीन विस्तारित इमारत बांधकाम, प्रवेश घेतलेल्या, फॉर्म न भरलेल्या विद्यार्थ्यांच्या शुल्कासंदर्भात निर्णय घेण्यात आले**

संस्थाध्यक्ष ॲड.देवेंद्र बुट्टे पाटील यांनी अध्यक्षीय मनोगतात सभासदांच्या सहकार्याने संस्थेची सर्वांगीण प्रगती होत असून, विद्यार्थ्यांना विविध सुविधा देण्यासाठी संस्था प्रयत्नशील असल्याचे सांगितले. तालुक्यातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संधीसाठी नूतन विस्तारित इमारत उभी करून एमबीए, पॉलिटेक्निक महाविद्यालय सुरू केल्याची त्यांनी सांगितले. संस्थेच्या वतीने आमदार बाबाजी काळे, राज्य सहकारी बोर्डाचे संचालक हिरामण सातकर, महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटीचे कुलसचिव डॉ.प्रकाश चौधरी, ॲड.पोपटराव तांबे, खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष नरेंद्र थिगळे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती विजयसिंह शिंदे, उद्योजक आशुतोष थिगळे, जीवन खराबी, राजू गोरे, सरपंच सुनीता येळवंडे या सभासदांचा विशेष सत्कार करण्यात आला. सत्कारमूर्ती सभासदांनी संस्थेला सर्वतोपरी सहकार्य करणार असल्याचे सांगितले.

संस्थेच्या विविध शाखांचे प्रतिनिधी म्हणून प्राचार्य डॉ.एस.एस. पिंगळे, प्राचार्य डॉ.एच.एम. जरे यांनी कामकाज पार पाडण्यास सहकार्य केले. प्रास्ताविक ॲड.देवेंद्र बुट्टे पाटील यांनी व आभार हिरामण सातकर यांनी मानले.

Hello Pune Gramin
Page No. 10 Sep 22, 2025
Powered by: erelego.com

# खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाची सभा उत्साहात




■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**खेड :** खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात शुक्रवारी उत्साहात संपन्न झाली.

संस्थेच्या वार्षिक अहवालाचे वाचन उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी केले. विषयपत्रिकेनुसार सभासदांनी चर्चा केली. नवीन विस्तारित इमारत बांधकाम, प्रवेश घेतलेल्या व परीक्षेचा फॉर्म न भरलेल्या विद्यार्थ्यांच्या थकीत शुल्कासंदर्भात सभेत चर्चा करून निर्णय घेण्यात आले. संस्थेच्या वतीने आमदार बाबाजी काळे, राज्य सहकारी बोर्डाचे संचालक हिरामण सातकर, महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटीचे कुलसचिव डॉ. प्रकाश चौधरी, ॲड. पोपटराव तांबे, खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष नरेंद्र थिगळे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती विजयसिंह शिंदे पाटील, उद्योजक आशुतोष थिगळे, जीवन खराबी, राजूशेठ गोरे, सरपंच सुनिता येळवंडे या सभासदांचा विशेष सत्कार करण्यात आला. सत्कारमूर्ती सभासदांनी संस्थेला सर्वतोपरी सहकार्य करणार असल्याचे सांगितले. या सभेत मोठ्या संख्येने सभासद उपस्थित होते. संस्थेच्या विविध शैक्षणिक शाखांचे प्रतिनिधी म्हणून प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, प्राचार्य डॉ. एच.एम. जरे, यांनी कामकाज पार पाडण्यास सहकार्य केले. प्रास्ताविक ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी व आभार हिरामण सातकर यांनी मानले.

पुढारी



शिक्षण प्रसारक मंडळाच्या सभेत मार्गदर्शन करताना आमदार बाबाजी काळे.

# खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाची सभा उत्साहात

**खेड : पुढारी वृत्तसेवा**

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाची हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवारी (दि. १९) उत्साहात पार पडली. सभेच्या अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टे पाटील होते.

या वेळी संस्थेच्या वार्षिक अहवालाचे वाचन उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी केले. विषयपत्रिकेनुसार सभासदांनी चर्चा केली. नवीन विस्तारित इमारत बांधकाम, प्रवेश घेतलेल्या व परीक्षेचा फॉर्म न भरलेल्या विद्यार्थ्यांच्या थकीत शुल्कासंदर्भात सभेत चर्चा करून निर्णय घेण्यात आले.

या वेळी आमदार बाबाजी काळे म्हणाले, तालुक्याच्या शैक्षणिक जडणघडणीत खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे योगदान महत्त्वाचे आहे. महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी म्हणून नैतिक जबाबदारी स्वीकारून संस्थेने खरेदी केलेल्या जागेत नवीन महाविद्यालयाला प्रशस्त इमारत बांधून देण्याचे आश्वासन दिले. संस्था पदाधिकाऱ्यांनी राजकीय आरोपांकडे दुर्लक्ष करून संस्थेच्या सभासदांच्या एकमुखी पाठबळाने शैक्षणिक कामकाज चालू ठेवण्याचे आवाहन केले.

संस्थाध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी सभासदांच्या सहकार्याने संस्थेची सर्वांगीण प्रगती होत असून विद्यार्थ्यांना विविध सुविधा देण्यासाठी संस्था प्रयत्नशील असल्याचे सांगितले. तालुक्यातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संधीसाठी नूतन विस्तारित इमारत उभी करून एमबीए, पॉलिटेक्निक महाविद्यालय सुरू केल्याचे त्यांनी सांगितले. संस्थेच्या वतीने आमदार बाबाजी काळे, राज्य सहकारी बोर्डाचे संचालक हिरामण सातकर, महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटीचे कुलसचिव डॉ. प्रकाश चौधरी, अ‍ॅड. पोपटराव तांबे, खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष नरेंद्र थिगळे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती विजयसिंह शिंदे पाटील, उद्योजक आशुतोष थिगळे, जीवन खराबी, राजूशेठ गोरे, सरपंच सुनिता येळवंडे या सभासदांचा सत्कार करण्यात आला. संस्थेच्या विविध शैक्षणिक शाखांचे प्रतिनिधी म्हणून प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे यांनी कामकाज पार पाडण्यास सहकार्य केले. प्रास्ताविक अ‍ॅड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी तर आभार हिरामण सातकर यांनी मानले.

My Pune Gramin Edition
Sep 20, 2025 Page No. 07
Powered by: erelego.com

**डॉ. संजय शिंदे**
**प्रसिद्धी विभाग प्रमुख**